# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. ३०

किंमत १ रुपया २५ पैसे

वर्ष ९ वे | २१ डिसेंबर १९९२ | अंक १८ वा


# शेतकऱ्यांची लढाई पुन्हा एकदा स्थगित

**शेतकरी संघटनेने ९ ते १२ डिसेंबर १९९२ या दिवसांत मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित केलेला शेतकऱ्यांचा महामेळावा अयोध्येत रामभक्त कारसेवकांनी केलेल्या 'कारसेवे'मुळे देशात भडकलेल्या हिंसाचारामुळे ऐनवेळी स्थगित करावा लागला.**

१९८२ सालापासून हिम्मत बांधून शेतकऱ्यांनी उभी केलेली लढाई बिगरआर्थिक कारणांनी देशातील परिस्थिती बिघडल्यामुळे स्थगित करावी लागण्याची पाळी अनेक वेळा आली.

१९८२ साली ऑक्टोबरमध्ये शेतकरी संघटनेची संपूर्ण महाराष्ट्रभर प्रचारयात्रा झाली आणि ३१ ऑक्टोबरला त्या प्रचारयात्रेच्या समारोपाप्रसंगी लढाईचे शिंग फुंकले जाणार तोच तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची अतिरेक्यांनी हत्या केल्याची वार्ता आली आणि लढाई स्थगित करावी लागली.

१९९२ साली केंद्रात जनता सरकार प्रस्थापित झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हात घातला जातो आहे अशी स्थिती निर्माण झाली तोच मंडलवाल्यांनी आणि मंडलविरोधकांनी गडबड केली.

१९९१ च्या मार्चमध्ये पुण्यात शेतकरी पंचायत भरली होती. तिची सुरुवात होताच दिल्लीतील राजकीय क्षेत्रात तंगडओढ होऊन चंद्रशेखर सरकार कोसळले. लगेच झालेल्या मध्यावधी निवडणुकांच्या ऐन प्रचार काळात माजी पंतप्रधान राजीव गांधींची हत्या झाली आणि चर्चेचे सर्व संदर्भच बदलले.

प्रत्येक वेळी शेतकरी लढाईची जय्यत तयारी झाली की क्षुद्रवाद देशामध्ये अशी काही घटना घडवून आणतो की ती लढाई स्थगित करावी लागते.

या वेळीही असेच झाले. १९९० मध्ये नरसिंहराव शासन दिल्लीत आले आणि खुल्या अर्थव्यवस्थेची घोषणा झाली. शेतकऱ्यांनी १० नोव्हेंबर १९९१ मध्ये शेगाव येथे जमून खुल्या अर्थव्यवस्थेचे स्वागत केले व राष्ट्रीय कृषिनीतीचा स्वीकार करून चतुरंग शेतीचा कार्यक्रम घोषित केला व शासनाने चतुरंग शेती कार्यक्रमाच्या आड येतील अशी धोरणे राबविण्याचा अट्टाहास करू नये असा इशारा दिला.

परंतु, शासनाने भाषा जरी मुक्त अर्थव्यवस्थेची केली असली तरी शेतीक्षेत्रासाठी तीच जुनी शेतकरीविरोधी नेहरूनीती राबविण्याचा, किंबहुना अधिक

## आंदोलन स्थगितीचे प्रसिद्धीपत्रक

**अयोध्येतील घटनांमुळे देशभर आणि विशेषतः मुंबईत तयार झालेल्या तणावाच्या परिस्थितीमुळे न्हावा-शेवा बंदराची नाकेबंदी करून गव्हाची आयात व नेहरूधोरण यांचा निषेध करण्यासाठी गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे शेतकरी संघटनेने अयोजित केलेला ९ ते १२ डिसेंबर रोजीच्या शेतकरी महामेळाव्याचा कार्यक्रम स्थगित करण्यात येत आहे. येथे वेगवेगळ्या भागातून मुंबईकडे येण्यासाठी निघालेल्या शेतकऱ्यांनी आपआपल्या गावी परत जावे आणि जातीय तणावाचे वातावरण आपल्या गावात येणार नाही याची दक्षता घ्यावी. आंदोलनाचा पुढील काय्रक्रम २८ डिसेंबर रोजी वर्धा येथे होणाऱ्या कार्यकारिणीच्या बैठकीनंतर जाहीर केला जाईल.**

**— शरद जोशी**

## भाग्याआड काळेराम

**जळगाव जिल्ह्यात खालील गावांत नेहरूनीतीचे दहन करण्यात आले.**

**१) जवखेडा २) रणाइचे ३) दहिवद (ता. अमळनेर) ४) किनगाव (ता. यावल) ५) विटनेर ६) तावसे ७) शेंदणी (ता. चोपडा). या कार्यक्रमांस श्री. चिमणराव पाटील व मी स्वतः हजर होते.**

**मुंबईच्या कार्यक्रमासाठी महिलांचा ट्रक घेऊन आम्ही निघणार होतो तोच ६ तारखेला रामाने देशात धुमाकूळ माजवला व ७ तारखेस त्याचे प्रत्यक्ष परिणाम लोकांस दिसू लागले व ऐकू येऊ लागले. शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी निघायच्या दिवशीच रामाने साऱ्या देशात घाण करावी. हे दुर्दैवच आमचे. हे काळेराम आमचा भाग्याचा दिवस उगवू देतील किंवा नाही हे आमचे नशिबच जाणे.**

**सौ. इंदिरा पाटील**

**विटनेर ता. चोपड, जि. जळगाव**

जाचक रीतीने राबविण्याचा सपाटा लावला. शासनाच्या नेहरूनीती राबविण्याच्या अट्टाहासाचा गव्हाच्या प्रश्नी कडेलोट झाला. पंजाब, हरयाना, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश इत्यादी गहूउत्पादक राज्यांनी देशातील गरजेला पुरून उरेल इतका गहू पिकविला. पण, शेतकरी शासनाने जाहिर केलेल्या प्रतिक्विंटल २९० रुपये भावापेक्षा जास्त भाव मागतात म्हणून परदेशातून दर क्विंटलमागे चक्क साडेपाचशे रुपयांपेक्षा जास्त खर्च करून गव्हाची आयात करायला सुरुवात केली. देशांतर्गत खुल्या बाजारात गव्हाला प्रति क्विंटल ३५० रुपये मिळत होते पण तेही शेतकऱ्यांना मिळू नयेत म्हणून गव्हाच्या खुल्या बाजारात व्यापाऱ्यांवर वेगवेगळे निर्बंध लादले, गहू राज्याबाहेर पाठविता येऊ नये म्हणून रेल्वे वाघिणींचा तुटवडा केला.

या सर्व पार्श्वभूमीवर महाराष्ट्रभर शेतकऱ्यांनी नेहरूनीतीच्या पुतळ्याचे दहन करून लढाईचा इशारा दिला. देशामध्ये ऊस व ज्यूट वगळता सर्वच शेतीमालांच्या उत्पादनात उल्लेखनीय वाढ झाली आहे आणि जो घाला गहू उत्पादक शेतकऱ्यांवर घातला गेला तोच इतर उत्पादनांच्या बाबतीत कधी घातला जाईल याबद्दल काही खात्री नाही अशा अवस्थेत शेतकऱ्यांना लढाईशिवाय पर्यायच उरला नव्हता. औरंगाबाद येथे झालेल्या शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत लढाईचा निर्णय घेण्यात आला आणि परदेशी गहू उतरणाऱ्या बंदरांची नाकेबंदी करण्याचा ठराव झाला.

इतरही पक्ष, संघटना जाग्या झाल्या. त्यांनीही गव्हाच्या आयातीबाबत सरकारला धारेवर धरले. त्यांचा उद्देश काही असो, शेतकऱ्यांना भाव न देता भरमसाठ परकीय चलन खर्च करून, तेही देश परकीय चलनाच्या संकटात रुतला असताना परदेशी गहू आयात करण्याचा विषय सर्वत्र चर्चेला आला. काही उघड उघड तर काही आडवळणाने शासनाची याबाबत चूक झाली असे म्हणू लागले. अगदी, सामान्य नागरिकसुद्धा वर्तमानपत्रातील वाचकांच्या पत्रव्यवहारात पत्र लिहून 'शासनाची यात चूक झाली' असे आपले मत मांडू लागले.

सत्तारूढ पक्षातील मंडळींच्या समर्थन करता करता नाकी नऊ आले. शेतकरी संघटनेने लढाईचा पहिला मोर्चा न्हावा-शेवा बंदरावर उघडण्याचे ठरविले. त्या बंदराची नाकेबंदी तर होणारच होती पण त्याउपर त्याला दिलेले शेतकरीविरोधी नेहरूंचे नाव रद्द करून त्याला सरखेल कान्होजी आंग्रे यांचे नाव देण्याची घोषणा शेतकरी संघटनेने केली होती.

या कार्यक्रमाची तयारी करण्यासाठी, तब्येत बरी नसतानासुद्धा शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी १४ नोव्हेंबर १९९२ पासून आपला महाराष्ट्र दौरा सुरू केला. १४ नोव्हेंबरला संपूर्ण महाराष्ट्रभर गावोगाव शेतकरीनीतीच्या पुतळ्यांचे दहन करून शेतकरी स्त्री-पुरुषांनी लढाईत उतरण्याची तयारी जाहिर केली. श्री. शरद जोशी लढाईमागची भूमिका स्पष्ट करीत जिल्ह्यामागून जिल्हे पार करीत होते.

दरम्यान, ठाणे विभागाच्या पोलिस आयुक्तांनी अधिसूचना काढून श्री. शरद जोशींना त्यांच्या विभागात प्रवेशबंदी जाहिर केली. न्हावा-शेवा बंदर त्यांच्या हद्दीत येते. शरद जोशींना अटक करून शासनाला, प्रशासनाला न्हावाशेवा येथे जमलेल्या शेतकरी स्त्रीपुरुषांवर बळाचा वापर करण्याची संधी मिळू नये म्हणून लढाईची जागा बदलून मुंबईतील गेट वे ऑफ इंडिया ही जागा निश्चित करण्यात आली. आणि कार्यकर्ते तयारीला लागले.

रायगड आणि लातूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी मुंबईत भिंती रंगविणे आणि पोस्टर्स चिकटविण्याचे काम जोमाने सुरू केले. महाराष्ट्रभर गावोगाव मुंबईकडे कूच करण्याची तयारी सुरू झाली. शिदोऱ्या तयार होऊ लागल्या.

६ डिसेंबरला नाशिक येथे श्री. शरद जोशींच्या दौऱ्याची समाप्ती झाली. तेथील सभा चालू असताना अयोध्येच्या बातम्या येऊन धडकल्या. सभा संपल्यानंतर शरद जोशी मुंबईस रवाना झाले. तेथे पोहोचल्यानंतर अयोध्येच्या प्रकारामुळे मुंबईतही दंगलींना ऊत आल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तरीही ९ डिसेंबरची लढाई निश्चित होणार, व्हायला हवी अशी सर्वांची इच्छा होती. पण ७ डिसेंबरला सकाळी महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून आलेल्या बातम्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातच दंगली पेटल्याचे कळले. लातूर, नांदेड, बीड, उस्मानाबाद, औरंगाबाद येथे दंगलींचा जोर जास्त होता. मुंबईत येणाऱ्या शेतकरी स्त्री पुरुषांना त्याचा त्रास होण्याची शक्यता लक्षात घेऊन अखेरी लढाईचा निर्णय स्थगित झाल्याची घोषणा झाली. पुन्हा, एकदा क्षुद्रवादाने शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यलढ्यास कोलदांडा घातला.

लढाईसाठी सज्ज झालेल्या शेतकऱ्यांचा विरस झाला. विदर्भ व मराठवाड्यातील अनेकजण अर्ध्या वाटेपर्यंत पोहोचले होते; काहीजण कल्याणपर्यंत तर काही पुण्यापर्यंत. पंजाबहरयानामधील पाचशेहून अधिक शेतकरी ९ तारखेला थेट मुंबईत पोहोचले होते. गुजरातमधीलही हजारो शेतकऱ्यांनी तयारी तशीच राहिली.

या सर्वांचीच भावना सोबतचे पत्र व्यक्त करीत आहे.

२८ डिसेंबर १९९२ रोजी वर्धा येथे विस्तारित कार्यकारिणीची बैठक होणार असून या बैठकीत लढाईतील पुढील डावपेचांची आखणी करण्यात येईल, त्यामुळे शेतकऱ्यांची लढाईची इच्छा पूर्ण होईल अशी आशा आहे.

## कर्जबाजारी देशात भारताचे स्थान 'वरचे'

वॉशिंग्टन : भारत गेल्या दशकात सर्वाधिक कर्ज घेणारा देश आहे. १९९१ मध्ये भारतावर एकूण ७१ अब्ज ५५ कोटी डॉलरच्या परकीय कर्जाचा बोजा होता. त्यामुळे कमी उत्पन्न गटातील देशांतील सर्वात कर्जबाजारी देशांच्या 'पंक्ती'त आता भारताची गणना होऊ लागली आहे.

जागतिक बँकेने १६ डिसेंबर रोजी येथे जारी केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे. भारताच्या डोक्यावर १९८० मध्ये २० अब्ज ६१ कोटी डॉलरचे कर्ज होते. १९९१ पर्यंत हा आकडा ७१ अब्ज ५५ कोटी डॉलरवर गेला. मात्र, कर्जफेड करताना समस्यांना तोंड द्यावे लागत असलेल्या देशांच्या यादीत भारताचा समावेश नाही.

## शेतकरी संघटक आजीव वर्गणीदार

### १ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर १९९२

| | | | |
|---|---|---|---|
| २२९) | श्री वारणा सह. दुध उत्पा. संस्था | अमृतनगर | (कोल्हापूर) |
| २३०) | श्री यशवंत हरी चव्हाण | पूरी | (नाशिक) |
| २३१) | श्री. नागोराव करपे (सरपंच) | गोंडपिंपरी | (चंद्रपूर) |
| २३२) | श्री. धर्मराव सावकार उत्तरवार | गोंडपिंपरी | (चंद्रपूर) |
| २३३) | श्री. विजय उद्धवराव माडूरकर | गोंडपिंपरी | (चंद्रपूर) |
| २३४) | श्री. रत्नाकर सराफ | सेलू | (परभणी) |
| २३५) | श्री. शिवाजी विद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. | निंबा | (अकोला) |
| २३६) | श्री. सेवा सह. सोसायटी | निंबा | (अकोला) |
| २३७) | मे. विदर्भ ॲग्रो एजन्सीज | वर्धा | (वर्धा) |
| २३८) | श्री. लहानू नारायण जेजूरकर | धामणगाव | (नाशिक) |
| २३९) | श्री. पोपट नामदेव जगझाप | येवला | (नाशिक) |
| २४०) | हिंदूस्थान एज्यूकेशन सोसायटी | औसा | (लातूर) |
| २४१) | विश्वास इलेक्ट्रीकल्स | लातूर | (लातूर) |
| २४२) | दगडूसाहेब संत्राम दाडगे | मोहगाव (तळणी) | (लातूर) |
| २४३) | वडगणे विविध कार्यकारी सेवा संस्था मर्यादित | वडगणे | (कोल्हापूर) |
| २४४) | श्री. पर्वतराव माने | दाहेगाव | |
| २४५) | श्री. रामनाथ गबाजी शिंदे | रहिमपूर | |
| २४६) | श्री. शरद वामनराव पाटील | नागपूर | (नागपूर) |
| २४७) | श्री. नाना पाटील पिंपळशेंडे | भिवणी | (चंद्रपूर) |
| २४८) | श्री. सतीषचंद्र दिनकरराव देशमुख | पणज | (अकोला) |
| २४९) | सौ. कमलाबाई श्रीरंग जठाळ | लातूर | (लातूर) |
| २५०) | श्री. बालकिशन द्वारकादास भूतडा | लातूर | (लातूर) |
| २५१) | श्री. अभय शहा | लातूर | (लातूर) |
| २५२) | सौ. अनुसया अण्णाराव कदमापूरे | ताडमुगळी | (लातूर) |
| २५३) | श्री. मारोती गोविंदराव येरणे | राजूरा | (चंद्रपूर) |
| २५४) | डॉ. अनिल पटवर्धन | अलिबाग | (रायगड) |
| २५५) | श्री. रामराव रावसाहेब मुळे | इरळद | (परभणी) |
| २५६) | श्री. राजाभाऊ पाटील | बुधगाव | (सांगली) |
| २५७) | श्री. रंगराव देवराव मगर | सावंगी | (परभणी) |
| २५८) | लिंपणगाव विविध कार्यकारी सह. सेवा सोसायटी | श्रीगोंदा फॅक्टरी | (अहमदनगर) |
| २५९) | वारणा सह. साखर कारखाना लि. | वारणानगर | (कोल्हापूर) |
| २६०) | श्री. राजेंद्र राऊत | वर्धा | (वर्धा) |
| २६१) | श्री. अरुण डोंगरे | केळकरवाडी, वर्धा | (वर्धा) |
| २६२) | श्रीपंचमसिंग बजरंगसिंग बिलवाल | इंजापूर | (वर्धा) |
| २६३) | श्री. अरुणा घुसे | मांडगाव | (वर्धा) |
| २६५) | श्री. वसंत सर्व सेवा. सह. सोसायटी लि. | म्हैसाळ | (सांगली) |
| २६६) | श्री. जगन्नाथ बुरघाटे | वाठोडा (शुक्लेश्वर) | (अमरावती) |
| २६७) | श्री. गणपत पोपट कातड | गंगापूर | (नाशिक) |
| २६८) | चेअरमन, वडाळा बहिरोबा सह. सेवा सोसायटी लि. | वडाळा बहिरोबा | (अहमदनगर) |
| २६९) | श्री. रोघोबा पा. डोहे | राजूरा | (चंद्रपूर) |
| २७०) | श्री. रामभाऊ शेंडे | वर्धा | (वर्धा) |
| २७१) | सौ. मालती बळीरामजी बोडखे | पारडी | (चंद्रपूर) |
| २७२) | श्री. गणपरावत देवकते | शेणगाव | (चंद्रपूर) |
| २७३) | सौ. माधुरी सुधीर वकारे | वर्धा | (वर्धा) |
| २७४) | सौ. विमल पंढरीनाथ टोणपे | वर्धा | (वर्धा) |
| २७६) | श्री. बी. बी. आलमान | पुणे | (पुणे) |
| २७७) | श्री. कृष्णराव देशमुख | जळका | (यवतमाळ) |
| २७८) | श्री. प्रकाश देशमुख | आर्वी | (वर्धा) |
| २७९) | लोकमान्य टिळक वाचनालय | नेरपरसोपंत | (यवतमाळ) |

# शेतकऱ्यांची जागरुकता

**– भाग्यश्री खेडेकर**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. तरी शेतकऱ्यांच्या मेहनतीचा योग्य मोबदला त्यांना मिळत नाही हे सर्वच मान्य करतात. खरं तर शेतकऱ्यांच्या जीवावरच आपल्या रोजच्या गरजेच्या वतू आपण खातो, वापरतो. पण या शेतकऱ्यांची कितीतरी बाबतीत सतत फसवणूक होत असते. खराब बी-बियाणे, खते यांची जास्त किंमत आकारणे, या सर्व अडचणी सहन करून शेतकरी पीक घेतो आणि हे पीक ग्राहकांपर्यंत पोचावे म्हणून दलाल, विक्रेता यांना देतो आणि स्वतःची कित्येकदा फसवणूक करून घेतो. ग्राहक संरक्षण कायदा १९८६ च्या अन्वये आता शेतकरी तक्रार करू शकतात आणि त्यांना न्याय मिळतो. वर उल्लेखलेल्या प्रकारच्या तक्रारी 'ग्राहक तक्रार निवारण फोरम'मध्ये झालेल्या आहेत आणि त्याबाबत त्यांना नुकसानभरपाईही मिळालेली आहे. त्यापैकीच ही एक तक्रारनिवारण कथा.

श्री. पुरुषोत्तम साडेकर, भोसरी ता. माढा जि. सोलापूर यांनी आपल्या शेतीतील जमिनीमध्ये ऊस लावला होता. दि. १३-१-८९ रोजी वरील माहिती एका ऊसगाळप कारखान्या व्यवस्थापकांनी घेतली होती. साधारण वर्षभराने ऊस कापणीला आल्यानंतर वरील कारखान्यास गाळपासाठी देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे १-२-९० रोजी ऊस तयार असून कापणीस आला असल्याचे साडेकरांनी कळवले. त्यानंतर १५-३-९० आणि १-४-९० रोजी त्यांना स्मरणपत्रेही पाठवली. प्रचलित नियमाप्रमाणे सदर शेतकरी दुसऱ्या कारखान्यास तो ऊस विकू शकत नव्हता. तसेच 'महाराष्ट्र गूळ उत्पादक परवाना आदेश १९७९' प्रमाणे त्यांना आपल्या उसापासून गुळाचे उत्पादनही करता येत नव्हते. कारखान्याने ठराविक मुदतीत आपला ऊस नेला नाही. म्हणून तो वाळून गेला. त्याची नुकसानभरपाई मिळावी म्हणून साडेकर यांनी ग्राहक-न्यायमंचाकडे धाव घेतली. कारखान्याच्या व्यवस्थापकांनी ऊस घेणारा कारखाना ग्राहक आहे व शेतकरी ग्राहक होऊ शकत नाही. म्हणून हे प्रकरण ग्राहक फोरमने चालवू नये असा युक्तिवाद केला. तसेच सदर शेतकऱ्याने आपली ऊस तोडणी करून

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 21st, December 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
December 21, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment **No. 87**

कारखान्यास आणून घालावा असेही कळवले होते. तथापि शेतकऱ्याने तो ऊस आमच्या कारखान्याला न विकता दुसऱ्या कारखान्याला विकून जादा पैसे मिळवले आहेत असा आरोप केला. यामुळे शेतकऱ्याच्या नुकसानीस कारखाना जबाबदार नाही आणि तो शेतकरी कारखान्याचा सभासद नसल्यामुळे त्याचा ऊस घेण्याचे बंधन कारखान्यावर नाही हेही स्पष्ट केले.

कारखान्याचा बचाव ग्राहक न्यायमंचाने अमान्य केला. वेगवेगळ्या नियमांनी शेतकऱ्यांचे हात बांधून टाकले गेले आहेत याचा सहानुभूतीपूर्वक विचार ग्राहक न्यायालयाने केला. भोगवती साखर कारखान्याने अजून वेगवेगळे मुद्दे मांडून न्यायालयाला आम्ही ग्राहक आहोत. आम्ही सर्व प्रकारच्या सूचना शेतकऱ्यांना जाहीरपणे वृत्तपत्रांतून दिल्या होत्या असेही सांगितले.

ग्राहक न्यायालयाने सर्व मुद्दे फेटाळले आणि साखर कारखान्याच्या व्यवस्थापकांनी श्री. पुरुषोत्तम साडेकर यांना अठरा हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी असा आदेश दिला. हा निकाल सोलापूर ग्राहक तक्रार निवारण फोरमने दिला आहे. साखर कारखान्यांच्या इतिहासात हा निकाल अभूतपूर्व म्हणावा लागेल. अशा प्रकारच्या केसमध्ये पुरावा म्हणून शेतकऱ्यांनी गेल्या वर्षाची कागदपत्रे उदा. दुसऱ्या शेतकऱ्याला मिळालेली किंमत, त्याची वस्तू विकत घेतल्याचे कागदपत्र द्यावेत. अशा प्रकारच्या तक्रारींनी शेतकरीही दिवसेंदिवस जागृत होत असल्याचे लक्षात येत आहे आणि हे आवश्यक आहेच.

(लोकप्रभा, दि. २९/११/९२ वरून साभार)

● ● ●

शेतकरी संघटना

# कार्यकारिणी बैठक

## वर्धा दि. २८ डिसेंबर १९९२

स. न. वि. वि.

अयोध्येतील घटनांमुळे देशभर आणि विशेषतः मंबईत तयार झालेल्या तणावाच्या परिस्थितीमुळे न्हावा-शेवा बंदराची नाकेबंदी करून, गव्हाची आयात व नेहरूधोरण यांचा निषेध करण्यासाठी शेतकरी संघटनेने गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे आयोजित केलेला ९ ते १२ डिसेंबर १९९२ रोजीचा शेतकरी महामेळाव्याचा कार्यक्रम स्थगित करण्यात आला.

दि. १४ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या काळात आदरणीय श्री. शरद जोशींनी संपूर्ण महाराष्ट्राचा सलग दौरा केला.

आपण सर्वांनी आपआपल्या जिल्ह्यात २ ऑक्टोबरपासून नेहरूनीती विरुद्ध जी जागृती केली, त्या जागृतीचे प्रदर्शन आपण लाखोंच्या संख्येत गेटवे ऑफ इंडिया मुंबईला करणार होतो. नेहरूनीती विरुद्ध बळीराज्य या लढाईचे रणशिंग मुंबईला फुंकले जाणार होते. परंतु पुन्हा एकदा धर्मवादाच्या राक्षसाने अर्थवादी चळवळीला प्रचंड धक्का दिला.

या सर्व पार्श्वभूमीवर विचारविनिमय करण्याकरिता वर्धा येथे २८/१२/९२ ला महाराष्ट्र कार्यकारणीची तातडीची व व्यापक बैठक घेण्याचे ठरले.

**बैठकीपुढील विषय –**

१) आर्थिक व राजकीय परिस्थितीचा आढावा.

२) पुढील कार्यक्रमाची दिशा ठरविणे.

या बैठकीकरीता संपूर्ण कार्यकारिणीचे सदस्य तसेच प्रत्येक जिल्ह्यातील तालुका प्रमुख व प्रमुख कार्यकर्त्यांना निमंत्रित करण्यात येत आहे. आपण आपल्या जिल्ह्यातील तालुका प्रमुखांना व प्रमुख कार्यकर्त्यांना निमंत्रण द्यावे व त्यांना बैठकीकरता घेवून यावे.

**बैठकीचे स्थळ :** श्री. मेहेर मंगल कार्यालय, आर्वी मोटर स्टँड,
न्यू इंग्लिश हायस्कूलजवळ, वर्धा.

**बैठकीची वेळ :** दि. २८/१२/९२ सकाळी ११-०० वाजता

आपले,

**सौ. सुमनताई अग्रवाल**
अध्यक्षा, शेतकरी महिला आघाडी

**किशोर माथनकर**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

*ज्या जिल्हा व तालुकाप्रमुखांना तसेच प्रमुख कार्यकर्त्यांना टपालाने निमंत्रण पोहोचले नसेल त्यांनी हेच निमंत्रण समजून बैठकीस अवश्य यावे.*

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,**
**६९३, बुधवार पेठ, पुणे - २.**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
**फोन : द्वारा - चाकण २३५४, २४६८**

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)**
**ता. खेड, जि. पुणे.**